


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *

१२. महाराष्ट्र विकासाची दिशा

अतुल देऊळगावकर ........................................ २२०

१३. शेतकऱ्यांच्या चळवळी : काल, आज व उद्या

डॉ. कुमार शिरालकर ........................................ २२६

१४. महाराष्ट्रातील उपेक्षित सामाजिक चळवळी

प्रा. जनार्दन वेदूर ........................................ २३५

१५. अस्मिता टिकवून लढताना !

प्रतिमा जोशी ........................................ २४३

१६. समकालीन 'स्त्रीवाद' आणि स्त्रीवादी चळवळीची भूमिका

डॉ. विद्युत भागवत ........................................ २५५

१७. ओबीसी चळवळ : अस्मिता आणि विकास

श्रावण देवरे ........................................ २६३

१८. विद्यार्थी चळवळ : पेच, संकट आणि संघर्ष

देवकुमार अहिरे ........................................ २७८

१९. नक्षलवादी चळवळीची उत्पत्ती आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रश्न

संजयकुमार कांबळे ........................................ २९१

२०. नर्मदा बचाओ आंदोलन : नागरीहक्क, विकास आणि विकासाचे नवे पर्याय

राहुल बैनाडकर ........................................ ३३०

२१. सामाजिक चळवळीसमोरील आव्हाने, सद्यस्थिती व उपाय !

सतकुमार गायकवाड ........................................ ३३७

२२. मुस्लिम चळवळीसमोरील आव्हाने

प्रा.डॉ. रफिक शेख ........................................ ३४३

२३. जागतिकीकरणात सामाजिक चळवळी व मानवी हक्क

रत्नाकर बाबुराव माहिते ........................................ ३५६

२४. महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळी आणि संघटना

संतोष पवार ........................................ ३७३

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# २३

# जागतिकीकरणात सामाजिक चळवळी व मानवी हक्क

□

रत्नाकर बाबुराव लक्षटे

सामाजिक चळवळी व मानवी हक्क परस्पर पुरक आहेत. सामाजिक चळवळी ह्या जागतिकीकरणात मानवी हक्काचे ध्येय साध्य करणारे साधन आहेत. मानवी हक्काच्या उल्लंघनातून आधूनिक युगात दलित, आदिवासी, पर्यावरण, मानवाधिकार, स्त्रीवादी, विद्यार्थी इत्यादी चळवळी उदयास आल्या. जागतिकीकरणाच्या युगातील सामाजिक चळवळीची दिशा व स्वरूपात विलक्षण बदल झाले. सामाजिक चळवळीतून मानवी हक्काची समर्पकता आणि उपयुक्तता स्पष्ट होते. सामाजिक चळवळी मानवी हक्क पुर्तीचे एक शस्त्र म्हणून पुढे येत आहेत का नाही समजून घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे. जागतिकीकरणात सामाजिक चळवळी व मानवी हक्क हे विषय चर्चेचे व महत्त्वाचे बनले आहेत. प्रत्येक देशाच्या राजकारण व अर्थकारणाला सामाजिक चळवळी व मानवी हक्काने व्यापले आहे. विविध जुन्या व नव सामाजिक चळवळीतून मानवी हक्काची पुर्तता होण्याविषयीचे समीक्षण अलीकडे होत आहे. लोकशाही मूल्यांच्या यशस्वीतेसाठी तसे करणे क्रमप्राप्त आहे.

१० डिसेंबर १९४८ ला संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्काचा वैश्विक जाहिरनामा घोषित केला. परिणाम स्वरूप अनेक नव स्वतंत्र राष्ट्रांनी त्याचा स्वीकार आपल्या संविधानात केला. भारत ही त्यास अपवाद नाही. भारताचे संविधान मानवी हक्काची पूर्तता करणारी एक सनदच आहे. तरीही स्वातंत्र्याच्या ६९ वर्षानंतरही मानवी हक्क रुजले नाहीत. भारतातील नागरीकाना हक्क व न्यायाच्या संरक्षणार्थ व प्राप्तीसाठी न्यायालयाकडे जावे लागते. पोटभर अन्न मिळवण्यापासून जगण्याच्या सुरक्षिततेशी निगडित असणा-या प्रत्येक विषयाबाबत सनदशीर व बेकायदेशीर मार्गाने प्रयत्न करून ही १२५ करोड लोकसंख्येतील ८० टक्के लोकांचे प्रश्न आजही सुटत नाहीत. अशा नैराश्याच्या व धटिंग व्यवस्थेत नागरी समाजाचे सदस्य. सामाजिक कार्यकर्ते, जनता,

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

शासन व प्रसार माध्यमांचे लक्ष आपल्या प्रश्नांकडे वळवण्यासाठी एक हत्यार म्हणून चळवळीचा आधार घेतात. याचा अर्थ सामाजिक चळवळीचा उदय शासनाची अयशस्विता व वाढत्या शोषणाचे प्रतिक आहे. सामाजिक चळवळीचा आधार जनतेच्या प्रश्नांना सोडवून शासकीय यंत्रणेस लोकाभिमुख व संवैधानिक बनवण्याचा आहे.

## सामाजिक चळवळी अर्थ

डिजीटलायझेशनच्या युगात सामाजिक चळवळीच्या बांधणी व कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या तंत्रात अमुलाग्र बदल झाला. तरी सामाजिक चळवळीच्या मुळाशी असणारा तिचा अर्थ नाही बदलला. आजही आपण आपल्या मूलभूत व इतर हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्याविरुद्ध व्यक्तिशः किंवा सामूहिकपणे आवाज उठवतो. त्याचे जेंव्हा सार्वत्रिकरण व लोकशाहीकरण होते. तेंव्हा त्यास आंदोलनाचे स्वरूप येते. मग एक नवी सामाजिक चळवळ उदयास येते. सत्याग्रह नावाच्या चित्रपटात याचे योग्य चित्रीकरण करून लोकासमोर दिग्दर्शकाने मांडले. सामाजिक चळवळ हा एक गतीमान, बहुव्यापक असा मानवी वर्तनाचा प्रकार असून तो कालांतराने एका विशिष्ट संघटनेत विकसित होतो. सामाजिक व्यवस्थेत अंशतः किंवा पूर्णतः बदल घडवून आणण्याचे ध्येय बाळगण्याच्या प्रक्रियेला सामाजिक चळवळ म्हणतात. अशी व्याख्या ॲंडरसन आणि पार्कर यांनी केली. सामाजिक चळवळीस बऱ्याच काळापासून सतत चालत येणाऱ्या सामूहिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून परिभाषित करता येते. सामान्यतः शासनाच्या कृत्या विरुद्ध होणारे प्रदर्शन किंवा राज्याच्या धोरण व वर्तनात परिवर्तनाची मागणी करण्याच्या प्रयत्नास सामाजिक चळवळी म्हणतात. नवीन सामाजिक चळवळी एका परिवर्तनाची मागणी करतात. ज्यात अशाच मागण्याचा समावेश केला जातो. ज्यांना आतापर्यंतच्या सामाजिक चळवळीद्वारे उपेक्षित ठेवले जाते.

समाज व शासन व्यवस्थेल बदल किंवा परिवर्तन आणि सुधारणा घडवूनं आणण्याच्या जनतेच्या सामूहिक ईहेला सामाजिक चळवळ म्हणतात. कालपरत्वे सामाजिक चळवळींच्या जडण-घडणी व स्वरूपात फरक असतो. तसेच उद्दिष्टेही बदलत जातात. सामाजिक चळवळी ह्या संघटित किंवा असंघटित असतात. त्यांचे स्वरूप व मार्ग शांततापूर्ण, हिंसक वा क्रांतीकारक असू शकते. कालखंड अनिश्चित असतो.

## सामाजिक चळवळी व मानवी हक्कं

युरोपमध्ये आधुनिक युगात सामाजिक न्याय व मानवी हक्काच्या संरक्षणार्थ फ्रेंच राज्यक्रांती पासून सामाजिक चळवळीचा प्रारंभ झाल्याचे अभ्यासक नमुद करतात. आधुनिक युगाचा विचार करता हे जरी सत्य असले तरी भारतात सामाजिक चळवळीच्या

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

उदयाचा इतिहास प्राचीन काळापासूनचा आहे. जैन, चार्वाक, गौतम बुद्ध, सम्राट अशोक यांनी भारताच्या प्राचीन इतिहासात मानवी हक्काच्या पुर्तीसाठी लोक आंदोलन उभे केले. मध्ययुगात उत्तर भारतात संत कबीर, दक्षिण भारतात महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्रातील वारकरी चळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य, राजा राममोहन रॉय यांची सती प्रथेची चळवळ, आर्य समाज, प्रार्थना समाज, ब्राम्हो समाज व महात्मा फुलेंचे सत्यशोधक समाज निर्मितीचे आंदोलन, छत्रपती राजर्षी शाहूंचे आरक्षण आंदोलन, महात्मा गांधीचे सत्याग्रहाचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर व जाती निर्मूलनाचे आंदोलन इ. अनेक चळवळी घडल्या.

जागतिकीकरणात सामाजिक चळवळी व मानवी हक्क या संकल्पनाच मुळात जागतिक स्वरूपाच्या बनल्या. साधारणपणे युनो, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, अलिप्ततावादी चळवळ, जागतिक बँक इ. वैश्विक संघटनाच्या व्यासपीठावर विविध देशातील नव सामाजिक चळवळी व मानवी हक्कांचा दर्जा या विषयी चर्चा होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचे वारे जगभरात वाहायला लागून आता जवळपास दोन किंवा अडीच दशके संपली आहेत. या अडीच दशकात उदयास येणा-या सामाजिक चळवळीचा संख्यात्मक आलेख वाढता आहे. शासन व्यवस्थेवर पडणा-या प्रभावाचा गुणात्मक आलेखही बराच चांगल आहे. परंतु तीची प्रभावकारकता व परिणामकारकता बोथट होत असल्याचे जाणवते. काही प्रसंगाचा अपवाद वगळता उदा : अण्णा हजारेंच्या लोकपाल चळवळीस मिळालेले यश. मुळात हे आंदोलन नवभांडवली व्यवस्थेच्या हीत संबंधाचे संरक्षण करणारे आहे. जागतिकिकरणातील नवभांडवली व्यवस्था भ्रष्टाचार विरोधी, दप्तर दिरंगाई विरोधी आंदोलनाचे समर्थन करते. परंतु सत्ता, अर्थकारण, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या समान वाटपाची भाषा करणा-या चळवळीचा नायनाट करते (रामदेव बाबाचे आंदोलन). एका बाजुने ही व्यवस्था सामाजिक चळवळीस पोषक वातावरण तयार करते. तर दुस-या बाजुने त्या चळवळीस अधिक शक्तीशाली होवू देत नाही. तित फुटीरतावादी व संकुचित आणि स्वार्थी प्रवृत्तीचा मिठाचा खडा टाकून त्यास कमकुवत बनवते.

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक बदलाचे वारे तीव्र गतीने वाहत आहेत. सर्वसामान्याच्या जीवनावरील माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे. जगाला खेड्याचे स्वरूप प्राप्त होत आहे. चळवळीला कार्यक्रम, विषय, ठिकाण Online ठरवले व प्रचारित केले जाते. सामाजिक चळवळीची धार प्रखर बनली. पण तिचा मानवी चेहरा

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

हरवला आहे. त्यामुळेच विविध सामाजिक चळवळीतून मानवी हक्काचा विषय आवर्जुन पुढे येत आहे. ध्येयप्राप्ती न होताच आज चळवळी मोडकळीस काढल्या जात आहेत. स्वातंत्र्य पुर्वकाळातील सामाजिक चळवळींना एक व्हिजन व ध्येयासक्तीचा स्पर्श होता. भारतात जयप्रकाश नारायण व अण्णा हजारेच्या आंदोलनाने त्यास जिवंत ठेवले. म्यानमारच्या ऑन सॉग सू कीच्या आंदोलनाने सामाजिक चळवळी कशा उभाराव्यात याचे निकष घालून दिले. वर्तमान सामाजिक चळवळी स्वतःची राजकीय व आर्थिक पोळी भाजून घेण्यापूरत्या उरल्याचेही जाणवते. काही चळवळी जागतिकीकरणाच्या व्यवस्थेचे खरे चित्र जनसामान्यांसमोर मांडणा-या आहेत. तर कांही चळवळींनी आपल्या जुन्याच विषयांना पुन्हा पुन्हा मांडण्याचे प्रामाणिक प्रयत्न चालवले.

जागतीकीकरणाने सामाजिक चळवळीस नवनवीन विषय दिले. त्यातील मानवी हक्क हा एक विषय आहे. मानवी हक्क हा विषय जागतिकीकरणात नवीन वाटत असला तरी त्याचा प्रारंभ जागतिक स्तरावर १० डिसेंबर १९४८ पासूनचा आहे. जागतिकीकरणात मानवी हक्काची जाणीव विकसित झाली. तरीही आंतरराष्ट्रीय स्तरावर हा विषय संशय व वादाच्या भोव-यातच अडकला आहे. यातून त्यास बाहेर पडण्यासाठी आवश्यक साधनांच्या संख्येत आणि व्याप्तीत फार मोठ्या प्रमाणात वाढ अपेक्षित आहे. मानवी हक्कांच्या अंमलबजावणीकडे लक्ष देणा-या क्षेत्रातही वाढ झाली. मानवी हक्कांच्या प्रोत्साहनाचे संदर्भही बदलत आहेत. मानवी हक्काच्या प्रोत्साहनासोबत त्याच्या संरक्षणविषयक तरतुदीतही वाढ झाली. अनेक आयोग व करारातील तरतुदींच्या अंमलबजावणी बाबतचे प्रयत्न होत आहेत. ॲमेनेस्टी इंटरनॅशनल व ह्युमन राईटस वॉच या अशासकीय संघटनांनी शासनावर दबावगट निर्माण केला. जगात घडणा-या हिंसाचाराच्या घटना व मानवी संरक्षणावर प्रकाश टाकला. मानवी हक्काचे प्रमाणात्मक मूल्य व व्यावहारीक उपयोग याबाबत चर्चा होत आहे. चळवळीनी स्त्री व पुरुषांच्या मानवी हक्कास प्राधान्य दिले.

प्रस्तुत लेखात भारतातील प्रमुख सामाजिक चळवळीमार्फत मानवी हक्कांच्या बाबत होणा-या विचार व कार्याचा आढावा घेतला आहे.

## पर्यावरण चळवळ

युरोपच्या मानवी हक्कांच्या अधिनियमात पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन, संतुलन आणि पर्यावरण शिक्षण यांचा समावेश करण्यात आला. व्यक्तीला प्रदूषणमुक्त पर्यावरण उपलब्ध करून देणे ही राज्याची जबाबदारी आहे. प्रत्येकाला स्वच्छ आरोग्याचा अधिकार आहे. पर्यावरण प्रदूषणामुळे मानवी हक्काचे उल्लंघन होते. पृथ्वीवरील नैसर्गिक साधन संपत्तीवर प्रत्येक सजीवांचा समान अधिकार आहे. त्याचा समान उपभोग घेणे हा सजीवांचा मूलभूत अधिकार आहे. परंतु व्यवहारात असे होत नाही म्हणून विकासाचा समतोल बिघडतो.

पर्यावरणवाद ही विचारसरणी आज एक महत्त्वाची राजकीय शक्ती म्हणून विकसित झाली. हरित चळवळ, हरित राजकिय विचार या नावाने ओळखली जाते. या विचारसरणीला आधार मानून पर्यावरण संरक्षणासाठी अनेक दबाव गट आणि राजकीय पक्ष युरोपच्या राजकारणात सक्रिय झाले. पर्यावरणीय चळवळीला मानवी हक्काचा स्पर्श झाल्यामुळेच हा विषय फक्त भारतापुरताच नाही तर वैश्विक स्तरावर चर्चेचा विषय बनला आहे. आज जागतिक पातळीवर पर्यावरण हा राजकारण आणि कुटनीतीचा भाग बनला आहे. पर्यावरणीय विषयावर जागतिक संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. जागतिक तापमान वाढ आज विश्व, समुदायाची प्रमुख समस्या बनली आहे. पर्यावरणाकडे शास्त्रीय अंगाने पहाता त्याच्या व्याप्तीत संपूर्ण जग त्यातील जीवजंतू त्यांचे नैसर्गिक स्थान आणि हवा, पाणी, जमीन इ. सर्वांचा समावेश होतो. ती एक आंतरसंबंधीय व्यवस्था आहे. राजकारणात त्याचा अभ्यास पर्यावरणाच्या माध्यमातून केला जातो. पर्यावरण ही एक वैचारिक चळवळ आहे. त्याचा उदय पश्चिमेकडील जगाच्या राजकारणात १९७० च्या दशकापासून झाला. भारतात पर्यावरण चळवळीचा उदय १९७३ च्या चिपको आंदोलनापासून झाला.

पर्यावरणीय चळवळीत अर्थशास्त्रीय आणि राजकारणाच्या विस्तृत दृष्टिकोनाचा समावेश करता येतो. या आंदोलनाद्वारे मानवी हक्क आणि आर्थिक न्यायाच्या माध्यमातून नैसर्गिक संसाधनाच्या वितरणाचा एक विशाल दृष्टिकोन जगासमोर ठेवला. उदा. नैसर्गिक संसाधनावर लोकांच्या अधिकारांना मान्यता देणे. जगण्याच्या गुणवत्तेत सुधारणा करून सन्मानाने रहाणे आणि निर्णय निर्धारणातील भागिदारीला सुनिश्चित करण्याचा समावेश आहे. पर्यावरणाच्या संरक्षणावर आधारित सर्व समावेशक विकासाची एक नवीन संकल्पना १९८० च्या दशकात उदयास आली त्यास चिरकालीन विकास या

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

नावाने ओळखतात.



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

पर्यावरणासंबंधीचे १९७२ सालचे स्टॉकहोम सम्मेलन वर्तमान आणि भविष्यातील पिढीवर पर्यावरणाची दशा आणि दृष्टिकोनासाठी मैलाचा दगड सिद्ध झाले. या सम्मेलनात वर्तमान आणि भविष्यातील पिढीसाठी पर्यावरणाची सुरक्षा आणि सुधारणा संबंधी चिंता व्यक्त करण्यात आली. ५ जून - जागतिक पर्यावरण दिन, २२ एप्रिल - पृथ्वी वसुंधरा दिन, २१ मार्च - विश्व वन्य दिन, २७ सप्टेंबर - विश्व लोकसंख्या दिन, ३ ऑक्टोबर - विश्व प्रकृती दिन, १६ ऑक्टोबर - विश्व खाद्य दिन, ४ ऑक्टोबर - विश्व पशू कल्याण दिन इत्यादी दिवस वैश्विक स्तरावर पर्यावरण व पर्यावरणाशी निगडीत संकल्पनांवर साजरे केले जाते. ते पर्यावरणीय चळवळीचे यश आहे.

भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात कलम ४८ अ हे पर्यावरण संरक्षणाशी संबंधित आहे. भारतातील पर्यावरणीय चळवळ वसाहतवादात राज्याद्वारा स्वीकारण्यात आलेल्या विकासाशी संबंधित वसाहतवादी धोरणाची टीका करते. स्वातंत्र्यानंतरचे राज्यसंस्थेने जनतेच्या आवश्यकतेवर आधारित कोणत्याही विकासासाठी कार्यात्मक सूचीचे समर्थन केले. भारतात राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य, संरक्षित क्षेत्र इत्यादी परंपरागत पर्यावरणाची ओळख स्पष्ट करतात.

परंपरागत पर्यावरणवादास प्रत्युत्तर म्हणून भारतात पर्यावरण चळवळीने गरीबांच्या पर्यावरणवादी विचारधारेचे समर्थन केले. गरिबांची पर्यावरणवादी विचारधारा विकासवादाची ना टीका करते आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे समर्थन करते. भारतीय पर्यावरण चळवळ नैसर्गिक संसाधनापर्यंत पोहचून त्याच्या वापरासंबंधी आणि समृद्धिच्या मुद्यावर लक्ष केंद्रीत करते. भारतीय पर्यावरण चळवळीचे मुख्य वैशिष्ट्ये आहे की यात प्रामुख्याने गरीब, महिला आणि अलाभान्वित लोकांना सहभागी करून घेतले जाते. जे पर्यावरणाच्या -हासाने प्रत्यक्ष प्रभावित आहेत. गाडगीळ व गुहा या पर्यावरणीय चळवळीच्या अभ्यासकांनी पर्यावरणीय चळवळीतील चार सुत्रांची मांडणी केली. जे अभिदृष्टी विचारसरणी आणि रणनीतीवर आधारित आहेत. प्रथम क्रमांक त्या चळवळीचा आहे जे पर्यावरणीय संसाधनाचा अतिवापर रोकणे आणि गरीब व उपांतिक वर्गासाठी न्याय सुनिश्चित करण्यासाठी नैतिक आवश्यकतावर भर देतात. मुख्यतः गांधीवादी या विचारांचे प्रणेते आहेत. संघर्षाच्या माध्यमातून अन्यायपूर्ण सामाजिक व्यवस्थेस नष्ट करण्याच्या आवश्यकतेवर दुस-या प्रकारच्या चळवळीत भर दिला आहे. या प्रकाराचे समर्थक म्हणून मार्क्सवाद्यांचा उल्लेख केला जातो. तिसरे आणि चौथे सुत्र पुनर्निर्माणाचे

ADAT VYAPARI ... ION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

समर्थन करते. भारतात पर्यावरणवाद आणि पर्यावरण चळवळीच्या उत्पत्तीचे श्रेय चिपको आंदोलनास दिले जाते. ज्याचे नेतृत्व सुंदरलाल बहुगुणांनी केले. जंगल आम्हास काय देते ? भूमी, वायू, पाणी या घोषणेतून या चळवळीला रुप मिळाले. चिपको आंदोलन ब-याच प्रमाणात यशस्वी ठरले. या आंदोलनामुळेच देशाच्या दुस-या भागात अशा प्रकारचे अनेक चळवळीचा उदय झाला. उदा. अपिको - चिलका (माश्याचे नांव) बचाओ चळवळ, (कर्नाटक), भोपाळ विषारी गॅस मोर्चा, बिहारमधील गंगामुक्ती आंदोलन, गोदावरी बचाव आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन, टेहरी धरण प्रकल्प विरोधी चळवळ, दाभोळ येथील एन्रॉन विरोधी जन आंदोलन, नरेंद्र मोदींचे गंगा स्वच्छता अभियान, भारत स्वच्छता अभियान इ. नर्मदा बचाव आंदोलनामुळे माहितीच्या अधिकाराचा उदय झाला. वर्तमानात त्याची प्रशासकीय पारदर्शकतेत व मानवी हक्काच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बनली आहे. याशिवाय पर्यावरणीय धोके लक्षात घेवून ओरिसात मास्को परियोजना आणि महाराष्ट्रात जैतापूर परमाणू प्रकल्पास विरोध झाला.

पर्यावरणीय चळवळीची विभागणी साधारणपणे जंगलविषयक चळवळी, जमिनविषक चळवळी, मोठ्या धरण प्रकल्पांच्या विरोधातील चळवळी, हवा प्रदूषणाच्या विरोधात होणा-या चळवळी सागरी स्त्रोतांच्या विरोधातील चळवळी इत्यादीमध्ये केली जाते. पर्यावरणीय चक्रात होणारी बिघाड मानवी जीवनाला व भविष्याला धोका निर्माण करते. नेत्रविकार, कर्णबधिरता कंबर व पाठदुखी, पोटाचे विकार, कर्करोगासारखे आजार होतात. मानवी आरोग्यांच्या संरक्षणासाठी पर्यावरण प्रदूषण टाळणे गरजेचे आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, आधुनिकीकरण इ. मुळे मानवी परिसर व पर्यावरण यांना धोका निर्माण होण्याची भीती मानवाला वाटू लागली. त्यातून कालांतराने पर्यावरणीय हक्क संरक्षण व संवर्धन या कल्पना पुढे आल्या व त्यास मान्यता देण्यात आली. माणूसआणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंधाचे जतन होण्याच्या हेतूने पर्यावरणीय चळवळीचा अभ्यास रामचंद्र गुहा, माधव गाडगीळ, जयंत बंडोपाध्याय, वंदना शिवा, हर्ष सेठी, बी. दासगुप्ता, रावत ए.एस., जे.एस. सिंग, बीना अग्रवाल, ए. अग्रवाल, फर्नांडिस व मेनन सप्रु टी. वेबर, नारायण, एल.सी. जैन, ठुकराल इ. अभ्यासक करतात. ज्यातून पर्यावरणात बिघाड झाल्यास उपाय सांगितले. पर्यावरणीय मानवी हक्क व सामाजिक न्यायाच्या संरक्षण, जतन व संवर्धन करण्यासाठी पर्यावरणात्मक चळवळी उभारल्या जातात.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

## मानवाधिकार चळवळ

वर्तमानकाळात आम्ही सर्वजण अशा युगातून मार्गक्रमण करीत आहोत की, जेथे मानवी हक्कांना सार्वजनिक घोषणातून मान्यता प्राप्त झाली. काही देशांनी त्यास आपल्या देशातील संविधानात समाविष्ट केले. व्यक्ति कांही सर्वव्यापक आणि सर्वविदित मानवी हक्कांसोबतच जन्म घेतो. त्या हक्कांना आम्ही नैसर्गिक मानवी हक्क म्हणतो. जॉन लॉकने Two Treaties on Civil Government या ग्रंथात व्यक्तिला जन्मतः मिळणा-या तीन निसर्गदत्त अधिकारांची चर्चा केली. ज्यात जीवन जगणे, स्वातंत्र्य व संपत्तीच्या अधिकाराचा उल्लेख केला. लॉकचे हे विचार फ्रेंच राज्यक्रांतीसह मानवी हक्क चळवळीचे प्रेरणा स्त्रोत बनले. परंतु वर्तमान युगातील विडंबना आहे की, या मानवी हक्कांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन आणि अवज्ञा होत आहे. अलिकडील काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवीय हिंसेच्या प्रमाणात विलक्षण वाढ झाली. ज्यामुळे मानवी हक्काच्या उल्लंघनाचे प्रमाण वाढले. आज सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक हक्काच्या उल्लंघनाच्या घटना अधिक प्रमाणात वाढत आहेत. जीवनाचा हक्क, स्वातंत्र्य व अभिव्यक्तिचा हक्क, सन्मानजनक जीवनस्तर सुधारण्याचा हक्क व अमानवीय वर्तन, वेठबिगारी, बालकामगार इ. शी संबंधित अनेक प्रकारच्या मानवीय समस्या निर्माण होत आहेत.

मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ नुसार मानवी हक्काचे संविधानात नमूद करण्यात आलेले मूलभूत अधिकार, आंतरराष्ट्रीय वैश्विक जाहिरनाम्यात समाविष्ट झालेले सर्व अधिकार जे जीवन स्वातंत्र्य, समता आणि प्रत्येक व्यक्तिच्या प्रतिष्ठेशी संबंधित आणि भारतीय न्यायव्यवस्थेद्वारे प्रवर्तनीय आहेत. मूलभूत अधिकाराच्या अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण सभा व सम्मेलनाचे स्वातंत्र्य व कायद्यासमोर समान या सर्वांना सहभागी केले जाते. वरील सर्व अधिकार न्यायालयाद्वारा प्रवर्तनीय आहेत. मार्गदर्शक तत्वातील शिक्षण, समान कामासाठी समान वेतन, समान न्याय व मोफत कायदेशीर सहाय्य आदिशी संबंधित आहे. ते राज्यासाठी मार्गदर्शक आहेत. न्यायाधिश पी.एन. भगवती ने राज्यघटनेच्या कलम २१ अधिक व्यापक बनवले. ज्यात जीवनाशी संबंधित सर्व अधिकार उदा. भोजन, कपडा, अन्न, निवास, हवा यांचा समावेश होतो.

स्वातंत्र्यानंतरच्या मानवी हक्कांच्या चळवळीस साधारणतः दोन विभागात विभाजित केले जाते. एक आणिबाणी पूर्व व दोन आणि-बाणी नंतर काळातील चळवळी.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

राज्याद्वारा साम्यवाद्यांच्या विरुद्ध प्रदर्शन करण्यासाठी १९४८ ला पश्चिम बंगाल नागरी स्वातंत्र्य समितीचे गठन झाले. नक्सलवाद्यांवर राज्याकडून होणा-या नरसंहारासोबत १९६० च्या दशकात शेवटी नागरी स्वातंत्र्य आंदोलनाच्या उदय झाला. या आंदोलनात न्याय आणि समतेसाठी समाजातील ग्रासलेल्या वर्गांच्यालोकशाही अधिकारांच्या मुद्याना उठवण्यात आले. १९७५ सालच्या आणीबाणी ने नागरि हक्क आंदोलनास प्रेरणा व दिशा दिली. त्या काळात मूलभूत अधिकारांना निलंबित करताना त्याचा वापर सुख संपन्न वर्गाकडून अधिकांश व्यक्तीच्या हितकारी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण करण्यासाठी करण्यात आला. अशा प्रकारे आणीबाणीत बौद्धिक व राजकारणी वातावरणास जन्म दिला. ज्यामुळे नागरी व लोकशाही अधिकार आंदोलनाचा उदय झाला. वर्तमानातील अधिकतर नागरी स्वातंत्र्याच्या संघटना नागरी आणि लोकशाही अधिकाराच्या संरक्षणार्थ लढण्यासाठी याच काळात अस्तित्त्वात आल्या. -

वर्तमानकाळात मानवी हक्कांसंबंधी अनेक समूह व संघटनीं विभिन्न राज्यात कार्यरत आहेत. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्त्वात १९७६ साली पीपल्स युनियन फॉर सिविल लिबर्टिज अॅन्ड डेमोक्रेटिक राइट्स, पी.यु.सी.एल. आणि पी.यु.डी.आर. इ. संघटनांची निर्मिती झाली. पी.यु.सी.एल. संघटना नागरी हक्क आणि लोकशाही हक्कात फरक मान्य करतात. सामाजिक परिवर्तना संदर्भात या संघटनेचा व्यापक उदारमतवादी दृष्टिकोन आहे. याविरुद्ध पी.यु.डी.आर. च्या मते सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांना परस्परापासून वेगळे करतां येत नाही. मागासलेल्या व शोषित लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांशी संबंधित चळवळीचे समर्थन करावे असे या संघटनेचे मत आहे. नंदिता हक्सरच्या मते - नागरी स्वातंत्र्याचे आंदोलन कोणतीही पर्यायी विचारसरणी प्रस्तुत करत नाही. चळवळीचा एकमात्र उद्देश संरक्षक म्हणून काम करताना राज्यावर नियंत्रण ठेवणे आहे. याशिवाय आंध्र प्रदेशात नागरी संघ, सी.पी.डी.आर. पंजाब - लोकशाही अधिकाराचे संघटन - ए.एफ.डी.आर. स्वातंत्र्यानंतर अनेक मानवाधिकार संघटनानी अनेक प्रश्नांवर आंदोलन उभारले. ए.आर. देसाई यांनी १९६० ते १९८० च्या दशकात गरीबांच्या मानवाधिकारांच्या उल्लंघनाबाबतच्या अनेक घटना उल्लेखित केल्या.

संयुक्त राष्ट्र संघटना, अॅमेनस्टी इंटरनॅशनल आणि मानवाधिकार समूहाच्या दबावामुळे भारतीय संसदेने इ.स. १९९३ साली मानवाधिकार संरक्षणास मान्यता दिली. परिणाम स्वरूप १९९४ मध्ये एक अधिनियम बनवण्यात आला. त्यामुळे राष्ट्रीय

ADAT VYAPARI ...ION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. हा आयोग पिडीत आणि मानवाधिकार समुहाकडून तक्रार मिळवतो. प्रसार माध्यमातून प्रदर्शित होणा-या बातम्याचा आधार घेतो. उदा : मागील काही वर्षापूर्वी रामलीला मैदानातील पोलिस कार्यवाहीबाबत आयोगाने स्वतःहून पोलिसाकडून माहिती मागवली. अनेक राज्यांनी मानवाधिकार आयोगाची स्थापना केली. राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय मानवाधिकार आयोगाने कैदेत मृत्यू, गर्दीतील मृत्यु, बलात्कार प्रकरण, बाल मजुरी, शरणार्थिसोबत होणारा दुर्व्यवहार इ. शी संबंधित प्रकरणात हस्तक्षेप केला. तसेच हे दोन्ही आयोग भारतात मानवी हक्कांची स्थापना करण्याच्या हेतूने सदैव अग्रेसर रहातात.

## स्त्रीवादी चळवळ

१९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकामुळे महिलांवरील साहित्याला प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर झालेल्या अनेक आंदोलनात इतर घटकाप्रमाणे महिलांचाही महत्त्वपूर्ण सहभाग दिसून येतो. प्राचीन, मध्ययुगीन, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या अनेक समाजसुधारकांच्या चिंतनात स्त्रियांची सामाजिक स्थिती, दर्जा विषमतापूर्वक मिळणारी वागणूक व होणारे अन्याय इ. विषय आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात प्रामुख्याने सामाजिक जनसमूह, नागरी समाज संघटना आणि विभिन्न विचारधारांना मानणा-या संघटनांनी स्त्रियांच्या प्रश्न व विषयांची प्रभावीपणे मांडणी केली. भारतीय संविधानाने प्रारंभापासूनच स्त्रियांच्या कल्याणाविषयीची तरतूद केली. परंतु भारतीय समाज हा मूलतः पितृसत्ताक आहे. ज्यात स्त्रियांची स्थिती व स्थान नेहमी दुय्यम दर्जाचे राहिले. सीमॉन-दी-बुआच्या मते महिलांना आजही निकृष्ट लिंग व सेकंड सेक्स यात सहभागी केले जाते.

भारतातील स्त्रीवादी चळवळीचे शहरी व ग्रामीण भागातील स्वरूप वेगवेगळे आहे. ग्रामीण स्त्रीवादी चळवळीमार्फत कौटुंबिक हिंसा, दारुबंदी, हुंडा पद्धतीस विरोध आणि बलात्कारी व्यक्तीस कडक शिक्षा करने इ. विषयास प्राधान्य क्रमाने मांडले जाते. शहरी महिलांचे हित ग्रामीण महिलांपेक्षा वेगळे आहे. तरी दोन्हीत एक साम्य आहे. ते म्हणजे दोघीही शोषणाच्या बळी आहेत. शहरी स्त्रीवादी चळवळीस पुढील प्रमुख मागण्यातून रेखांकित केले जाते. उदा : समान काम समान वेतन, कामकाजाच्या ठिकाणी शारीरिक शोषणाची समाप्ती, आणि कामकाजाच्या जागेवर महिलांना योग्य सुरक्षितता पुरवणे इ.

भारतात स्त्रीवादी आंदोलनाचा प्रारंभ राजकीय पक्षाच्या माध्यमातून झाला.

ADAT VYAPARI ... DEGLOOR COLLEGE ... Dist.Nanded

१९७८ साली साम्यवादी पक्षाशी संबंधित ऑल इंडिया डेमोक्रटिक विमेन्स असोसिएशनची स्थापना झाली. सार्वजनिक जीवनात कार्यरत असणा-या महिलांच्या समस्या दूर करण्यासाठी सेवा देणे. सेल्फ इम्प्लॉयड विमेन्स असोसिएशनच्या स्थापनेतून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन देण्याचे समर्थन करण्यात आले. तसेच महिलांच्या घरगुती कार्याचे महत्त्व सांगण्यात आले. १९८० च्या दशकात स्त्रीवादी आंदोलनास अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. रूप कंवरला सती बनवण्याच्या विषयास महिलांनी देशव्यापी बनवले. कारण राजस्थानमध्ये रूप कवंरला आपल्या पतीच्या चितेवर बलपूर्वक बसवण्यात आले. स्त्रीवादी चळवळीत समतेशिवाय विषमतेवर भर दिला जात आहे. यामध्ये महिलांनी कौटुंबिक हिंसा, स्त्री भ्रूण हत्या, हुंडा पद्धती इ. स्त्री जीवनाशी संबंधित विषयाला उचलून धरले.

भारतीय लोकशाहीच्या ६८ वर्षाच्या कार्यकाळात महिलांच्या स्थितीत निर्णायक सुधारणा झाल्या. तरीही महिलांची स्थिती आजही शोषित आणि वंचित आहे. समाजातील सर्व महिलांची स्थिती जवळपास सारखीच आहे. काही लोकामार्फत धार्मिक आधारावर स्त्रीवादी चळवळीचे विभाजन करण्याचे प्रयत्न होत आहेत.

१९८५ च्या शाहबानो प्रकरणानंतर मुस्लिम महिलांना पोटगी घेण्याचा अधिकार आहे का नाही. हा प्रश्न महत्वपूर्ण बनला. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे महिलांना पोटगी दिली जाते असे स्पष्ट केले. परंतु कट्टरपंथी वर्गाच्या दबावात येवून राजीव गांधी सरकारने १९८६ साली सिव्हिल प्रक्रियात संशोधन केले. ज्यानुसार मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार नाही. वर्ष २००६ मध्ये पुन्हा इमराना प्रश्नी धार्मिक विवाद महत्त्वपूर्ण बनला. सर्व धर्माच्या महिलांचे हित सारखेच आहे. त्यामुळे धार्मिक आधारावरील मतभेदामुळे स्त्रीवादी चळवळ कमकुवत बनली. भविष्यात स्त्रीवादी चळवळीचे ध्येय संसदेत महिलांच्या आरक्षणास लागू करणे आहे. जेणेकरून स्त्रीया निर्णय निर्धारण प्रक्रियेत सहभागी बनतील. आपल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक स्थितीत सुधारणा करून घेतील. भारतात स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण स्त्रियांच्या समानतेच्या चळवळी, स्त्रियांच्या मुक्तिच्या चळवळी (गेल ऑम्वेट), सामुदायिक स्त्रित्वाची चळवळ (यांना एव्हरेट) यात केले जाते. भारतातील सुधारणावादी स्त्रियांच्या चळवळीला क्रमवार जातीसंस्था, हिंदू धर्म, एकत्र कुटुंब पद्धती, इस्माली राज्यकर्ते व ब्रिटीश वसाहतवाद या पाच घटकांनी आकार दिला आहे, असे याना एव्हरेट यांचे मत आहे. शेतक-यांची चळवळ, जमातीच्या चळवळी, विद्यार्थ्यांची चळवळ,

स्त्रीवादी चळवळ, दलितांची चळवळ, पर्यावरण चळवळ, विविध प्रश्नीय चळवळीत या अलिकडील नवजागरणाच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग आणि भूमिका सक्रिय झाला आहे. ज्याचा अभ्यास वेचे इलिना सेना, सिंघा रॉय, गोविंद केळकर, कुमकूम सांगरी, सुदेश वैद, सुनिल सेन, कपिल कुमार, शिरीन मेहता व के.पी. कण्णन यांनी केला आहे. या सर्व चळवळीच्या संघटनात्मक बांधणी, कार्यक्रम आणि कार्यपद्धती वेगवेगळ्या आहेत.

आलेटकर, डी.जैन, मुजुमदार व शर्मा के. अहमद वाडले, मधू किश्वर व सूर, के. शर्मा, नीरा देसाई व विभती पटेल, एस. कौशिक, ए. सिंग आणि हकेसर, पी. चौधरी, बीना अग्रवाल, पारिख व गग्र, दुबे व पारलीवाला, गेल ऑम्वेट, अग्रेस हे काही प्रमुख स्त्रीवादी अभ्यासक आहेत. स्त्रीवादी विचारवंत स्त्री-पुरुष समानता येण्यासाठी स्त्रियांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. म्हणून या जाती, वर्ग, धर्म, समुदाय आणि राज्य यांच्या सीमा ओलांडून पलीकडे गेल्याचे दिसते. या सर्व स्त्रीवादी अभ्यासकांनी स्त्रीवादी चळवळीला दिशा देणारे व परिपक्व बनवणारे वैचारीक खाद्य पुरवले. स्त्रियांच्या सामाजिक दर्जा, कौटुंबिक स्थान, विवाह व सामाजिकरण, अत्याचार लैंगिक शोषण, स्त्री समानता, स्त्री मुक्ती, स्त्री हक्क पुरुषाच्या जुलमातून स्त्रीला मुक्ती इ. विषयावर लिखाण केले. या लिखाणातून स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करणारेच तिच्यावर अत्याचार करण्यात आघाडीवर असतात. मानवी हक्काची पायमल्ली करतात, ब-याच वेळेस असेच लोक स्त्रीवादी चळवळीचे नेतृत्व करतात. नातेवाईकच स्त्रियांचे भक्षक आहेत. खाप पंचायती स्त्री स्वातंत्र्यावर मर्यादा आणतात. भ्रमणध्वनीद्वारे तिला अश्लील दूरध्वनी व मॅसेज करणे. संगणकाच्या साह्याने छळणे इ. निष्कर्ष पुढे आले.

या अभ्यासातून व क्राईम पेट्रोल, सावधान इंडिया दस्तक, सीआयडी पोलीस वार्ता व लक्ष्य इ. कार्यक्रमातून स्त्रियांच्या मानवी हकांचे उल्लंघन करण्यात पोलीस खात्यातील कर्मचारी, कार्यालयातील अधिकारी, डॉक्टर्स, राजकीय नेते, संबंधित कुटुंबीय यांचा समावेश असल्याचे पहायला व वाचायला मिळते. या सर्वाविरुद्ध अनेक स्त्रीवादी चळवळी, राष्ट्रीय महिला आयोगाने निषेध व तक्रारी केल्या. परंतु दुर्दैवाने कायद्यातील व न्याययंत्रणेतील दोष, पुरुषप्रधान संस्कृती व दृष्टिकोण यामुळे हे अन्याय चालू आहेत. उलट जागतिकीकरणात शिक्षण व नोकरीच्या निमित्त घराबाहेर पडणाऱ्या महिलावरील अन्यायात वाढच होत आहे. कारण स्त्रियां...

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

नाही. स्त्री समानता व स्वातंत्र्याबाबत सर्वांचे दृष्टीकोण वेगळे आहे. राज्याबाबतचा विचार वेगळा आहे. काम करण्याची त-हा व पद्धत वेगळी आहे. या संघटना विविध विचारसरणीने प्रभावित असल्यामुळे त्यांना स्त्रियांचे हित साध्य करण्यात यश येत नाही.

## विद्यार्थी चळवळ

भारतात अनेक नव सामाजिक आंदोलनापैकी विद्यार्थी आंदोलन हे एक आहे. अलिकडील काळात या चळवळीने राजकारण व शिक्षण क्षेत्रात नवीन स्थान प्राप्त केले. उदा : विद्यापीठ नामांतर आंदोलन, लोकपाल आंदोलन, हैद्राबाद विद्यापीठातील वेमुल्ला राहूल विद्यार्थ्याच्या हत्येनंतरचे प्रकरण, तसेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्रकरण (Feb-2016) याशिवाय सत्याग्रह, शिवा, एक गाव सावरखेडा या चित्रपटात विद्यार्थी आंदोलनातून होणा-या परिवर्तनाचे चित्रिकरण केले आहे. विद्यार्थी समाजातील सर्वात जागरूक वर्ग असतो. कोणत्याही चळवळीस मूर्त रूप देण्यासाठी विद्यार्थ्यांचे सक्रिय सहकार्य आवश्यक असते. आजपर्यंत देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या वेळी विद्यार्थी आंदोलन शैक्षणिक समस्या ते राजकीय मुद्यापर्यंत झाले आहेत. १९६१ साली टॉस् यांनी विद्यार्थी विरोधाचे राजकीय, आर्थिक, नैतिक, शैक्षणिक, मजा/गंमत असे पाच प्रकार सांगितले आहेत. एका अर्थाने विद्यार्थी आंदोलन सर्वसाधारणपणे वर्तमान आर्थिक आणि राजकीय संकट आणि सामाजिक व्यवस्थेच्या परिवर्तनशील स्वरूपाचा एक हिस्सा आहे. शिक्षण आयोगानुसार विद्यार्थ्यांत वाढत्या बेशिस्तीसाठी वयस्क वर्गातील बेशिस्त आणि त्यांच्यातील शैक्षणिक आदर्श जाणिवांचा अभाव उत्तरदायी आहेत. वाढती बेरोजगारी, व्यसनाधिनता, दारिद्र्य, सुविधांचा अभाव, पौगंडा अवस्थेतील ताणतणाव, नकारात्मक व्यक्तिमत्त्वाचे लक्षण इ. बाबी विद्यार्थी आंदोलनासाठी कारणीभूत असल्याचे अनेक अभ्यासातून स्पष्ट झाले.

विद्यार्थी जीवनास प्रभावी करणा-या समकालीन अनेक समस्यावर विद्यार्थी विरोध प्रदर्शित करतात. उदा : रॅगिंग, फी वाढ, वसतीगृहातील सुविधा, वाय-फाय सुविधा, ग्रंथालयात पुस्तकांची उपलब्धता यातील प्रत्येक आंदोलनास प्रसिद्धी मिळतेच असे नाही. कॉलेजमध्ये वर्ग, तासिका, पिण्याचे शुद्ध पाणी, भौतिक सुविधांची आवश्यकता, वसतीगृहात अधिक सुविधा मिळाव्यात इ. ची मागणी केली जाते. परीक्षा पद्धतीत वारंवार होणारा बदल, दुष्काळग्रस्त परिस्थितीत परीक्षा फी माफ करणे हे विद्यार्थी संघटनेस बळकट करणारे प्रश्न आहेत. प्राचार्य, प्रशासन, संचालक, प्राध्यापक व

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

कर्मचारी यांची वाढती कर्तव्यकसूरता, अरेरावी, भ्रष्टाचार, चारित्र्यहीनता अश्लिलता वर्गखोल्यांची कमतरता, अभ्यासक्रमातील रटाळपणा, प्रयोगशाळेतील सुविधांचा अभाव, प्राध्यापकांचे तास न होणे इ. विषयावर महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांचे आंदोलन घडत असते. या आंदोलनातून विद्यार्थी शैक्षणिक मूल्यांची जपणूक व संरक्षण करत असतात. तसेच विद्यार्थ्यांत मानवी मूल्य रुजविण्याच्या दिशेने शिक्षण व्यवस्थेला बदलण्याचे प्रयत्न करतात. विशेषत: जागतिकीकरणात शिक्षणाकडे पाहण्याचा व्यावसायिक दृष्टिकोन, विद्यार्थी-पालक व प्राध्यापकातील समन्वयाचा अभाव, शिक्षणातील ढासाळती मूल्यात्मकता, कारकुनी शिक्षण व्यवस्था, शिक्षणाकडे व शिक्षण क्षेत्रातील नोकरीकडे (कारकुन, शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य) साईड जॉब म्हणून पाहण्याचा विकसित होणारा दृष्टिकोन, चांगल्या शिक्षक व प्राध्यापकांची प्राचार्य, मुख्याध्यापक व प्रशासनाकडून होणारी वाताहत व अपमान, सन्मानजनक वागनूक न मिळणे, कामचुकार, राजकीय क्षेत्राशी निगडित व्यक्तींचा शिक्षण क्षेत्रातील सुळसुळाट, पाटील, वतनदार, देसाई, देशमुख, जावई इत्यादींची शिक्षण क्षेत्रात होणारी आवभगत, विद्यार्थ्यांना न मिळणारा शैक्षणिक न्याय व त्यांच्या शैक्षणिक हक्कांचे होणारे हननच त्यांना आंदोलन करण्यास प्रेरित करते. अलिकडील जवळपास सर्वच सामाजिक चळवळीत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत आहे.

## जन-जागृती आंदोलन

जनजागृती या नव्या सामाजिक चळवळींना महत्त्वाचे स्थान अलिकडील काळात दिले जाते. जनजागृतीच्या प्रसारात अशासकीय संघटना आणि नागरी समाजाचे महत्त्वाचे व प्रशंसनीय योगदान आहे. मागील कांही दशकापासून भारतात सामाजिक कार्यकर्त्यांच्या लहान-लहान समूहामार्फत विविध भागात आर्थिक, सामाजिक, कृषी, साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन इ. विषयाला प्राधान्य देणारी आंदोलने झाली. परंतु १९९० च्या शतकात वैश्विक राजकीय, आर्थिक शक्ती संघटन व संस्थांच्या प्रभुत्ववादी धोरणाविरुद्ध आवाज उठवणा-या मूलभूत संघटना आणि मंचासोबत चळवळी समरस झाल्या. या चळवळीमुळेच भारतात माहितीच्या अधिकारासह अनेक नवनवीन कायद्यांचा उदय झाला. तसेच नवनवीन मानवी हक्कांना घटनात्मक स्थान मिळाले. जनजागृती चळवळीस यशस्वी बनविण्यात सोशल नेटवर्किंग साईट व मिडियांची भूमिका महत्त्वाची आहे. यांच्या रचनात्मक सहकार्यामुळेच सामाजिक कार्यकर्ते अन्ना हजारे मार्फत चालवण्यात आलेले भ्रष्टाचार विरोधी व लोकपाल आंदोलन प्रभावशाली ठरले. ते सोशल

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

राहिले. नरेंद्र मोदिंनी याचाच वापर करून २०१४ च्या लोकसभा निवडणूकीचे अभियान चालवले. विजय मिळवला. जनजागृती आंदोलने हे सुशिक्षितांची डिजिटल चळवळ आहे.

नवीन सामाजिक चळवळी मानवी हक्काच्या प्रश्नांशी निगडित आहेत. ज्यांचा समावेश या उत्तर आधुनिक राजकारणाअंतर्गत केला जातो. ज्या मानवी जीवनातील अन्यायाप्रती नव्या चेतनेने प्रेरित असतात. समकालीन जगातिल काही भागात त्यांचा उदय होत आहे. सामाजिक चळवळीचे नवीन रूप त्यातून स्पष्ट होत असल्यामुळे त्यास नवीन सामाजिक चळवळी म्हणतात. यांचा संबंध मानवी जीवनाच्या शाश्वत विकासाशी आहे. नव्या सामाजिक चळवळींचा हेतू फक्त केंद्र किंवा राज्यांच्या सत्तेत सुधारणा करणे नसून त्यासोबतच वैयक्तिक व सामुहिक नैतीकतेची स्थापना करणे आहे. या चळवळींचा संबंध विशिष्ट एक जात, वर्ग, समूहाशी नसतो. तर त्यात सामूहिक हिताशी संबंधित असतात.

निष्कर्ष : या चळवळीचा भारतीय लोकशाहीवर बराच सकारात्मक परिणाम झाला. कोणतीही राजकीय व्यवस्था समाजातील विद्यमान सर्व प्रश्नांस सोडविण्यासाठी सक्षम आहे असे म्हणणे अतार्कीक व एकांगी विचार करणे होय. असा विचार सामाजिक व राजकीय लोकशाहीस घातक ठरेल. सर्व समाजात अंतःविरोध असतात. विद्यमान व्यवस्था काही प्रश्नांना सोडवते. तर समाजातील विभिन्न घटकात नवे विवाद उत्पन्न करते. मतभेद लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. सामाजिक चळवळी संघटीत मतभेदाचे एकरूप आहे. सामाजिक चळवळी तक्रार आणि प्रश्नांच्या अभिव्यक्तीसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देते. राज्यावर दबाव टाकतात. स्वच्छ लोकशाहीसाठी प्राधिकरणावर नियंत्रण ठेवतात. सामाजिक चळवळी सर्वसामान्यांच्या आवाज व मागणी आहेत. विशेषतः ज्यांना राजकीय व्यवस्थेने नाकारले व समाजधुरीणांनी ज्यांच्या मानवी हक्कांची पायमल्ली केली अशांचा ती आधारवड आहे.

सत्तावादी आणि परंपरागतवाद्यानुसार सामाजिक चळवळी व मानवी हक्क निरर्थक आहेत. नवभांडवली व्यवस्थेत तर सामाजिक चळवळीचे म्होरकेच त्यांचे हस्तक आहेत. मानवी हक्क या विषयावर चळवळींनी फक्त चर्चा करावी. या चर्चेतून जनसामान्यांचा आवाज नवभांडवल वाद्यापर्यंत पोहंचवावा जेणेकरून ती चळवळ मोडीत काढण्यास आणि मानवी हक्कांचे तीन तेरा करण्यात नवभांडवलवाद्यांना यश येईल. जागतिकीकरणाचे युग नव्या आदर्श, उत्तम सामाजिक व्यवस्थेची मागणी करण्यातील

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

मोठा अडसर आहे. जागतिकीकरणाच्या समर्थकांच्या मते - सामाजिक चळवळ, सामाजिक न्याय, मानवी हक्क हे विषय निरर्थक आहेत. या विषयावर आंदोलने सहन केली जाणार नाहीत. त्यामुळे न्यायापुर्तीच्या दिशेने होणा-या सामाजिक चळवळी त्यांना बेजबाबदार व व्यवस्था मोडणा-या वाटतात. उत्तर आधुनिक सिद्धांतकारांच्या मते वरील दृष्टिकोण अतार्किक आहे. त्यांच्या मते सामाजिक चळवळी लोकशाहीत अनेकसत्तावादाचे प्रतिक आहे. जे आवश्यक नसून अपरीहार्य आहे. वर्तमान खाऊजा युगात व्यक्तिंच्या जीवनावर राज्य आणि समाज या दोन्हींचे आक्रमण होत आहे. अशा परिस्थितीत मानवी हक्क, सामाजिक न्याय, व्यवस्था बदल या हेतुने लढणा-या सामाजिक चळवळीचे महत्त्व अधिक वाढले. पर्यावरण संरक्षण, महिला सबलीकरण, मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक न्यायाची पूर्ती या विषयाचा सामाजिक चळवळीवर प्रभाव आहे.

सारांशतः सामाजिक चळवळी लोकांच्या राजकीय चैतन्यांचा परिणाम आहे. आपल्या मागण्या पूर्ण करण्याच्या हेतूने त्या एक जन-चैतन्याची अभिव्यक्ती आहेत. सामाजिक चळवळी राजकीय विषयावर लोकांचा सहभाग वाढवतात. संघर्षाची कार्यसूची समोर ठेवूनच लोकांच्या चैतन्याचा विकास केला जातो. राजकीय भागिदारी आणि जनचेतना लोकशाहीच्या मजबूत आधारशीला आहेत. सामाजिक चळवळी मानवी हक्कांविषयीच्या जनसामान्यांच्या आशा-आकांक्षा, गरजा आणि अपेक्षांना व्यक्त करतात. त्यामुळे शासनकर्त्यांस मानवी हक्काबाबत निर्णय घेताना जागरुक रहावे लागते. सामाजिक चळवळी निर्णय निर्धारण प्रक्रियेला प्रभावित करतात. कायदे बनवतात. मानवी हक्क व सामाजिक न्यायाचा विचार करायला भाग पाडतात. जागतिकीकरणात राज्यासाठी ग्राहक वर्गच प्रमुख बनला आहे. यामुळे सामाजिक चळवळी व्यक्तिंच्या सार्वजनिक आणि खाजगी जीवनातील मानवी हक्काच्या सुरक्षेसाठी अत्याधिक महत्त्वपूर्ण बनल्या. रजनी कोठारीच्या मते भारतात लोकशाही भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीकरण लोकांसाठी एक तमाशा बनला आहे. लोकांत निराशा आणि असंतोष वाढत आहे. अशा परिस्थितीत सामाजिक चळवळी महत्त्वाच्या बनल्या. भारतात आतापर्यंत मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक न्याय, व्यवस्था परिवर्तनाच्या हेतुने लढलेल्या अनेक सामाजिक चळवळीची दिशा सकारात्मक राहिली. परंतु जागतिकीकरणात त्याची दिशा प्रशंसा करण्याइतपत समाधानकारक राहिली नाही. अलिकडे या चळवळी दिशाहीन व भ्रामक बनत आहेत या चळवळीस व्यापक जन

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



समर्थन किंवा प्रशंसा व्हावी. तसेच सरकारमार्फत या आंदोलनाविरुद्ध सक्तीचा वापर न करता त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या गांभिर्यतेकडे लक्ष द्यावे. बहु-सांस्कृतिक भारतात लोकशाही प्रतिनिधित्वास सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक चळवळींची आवश्यकता आहे. ज्यामुळे सत्ता, निर्णय निर्धारणापासून वंचित राहिलेल्यांची भागिदारी सुनिश्चित होईल.

संदर्भ :


१. *भारतातील सामाजिक चळवळी - प्रा. घनश्याम शहा - अनुवाद प्राची चिकटे - डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.*
२. *मानवी हक्क आणि सामाजिक न्याय - प्रा.पी.के. कुलकर्णी - डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.*
३. *विचारवंत आणि समाज - संपादक - प्रा. अशोक चौसाळकर, युनीक अकॅडमी, पुणे.*
४. *मानवी हक्क तत्त्व आणि दिशाभूल - उद्धव कांबळे, (आयपीएस), सांकेत प्रकाशन, औरंगाबाद.*
५. *मानवी हक्क - प्रा.व्ही.बी. पाटील - के सागर पब्लिकेशन्स, पुणे.*
६. *मानवी हक्क - प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार - प्रा. सुधाकर कुलकर्णी - मानवाधिकार राष्ट्रीय कार्यशाळा, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.*
७. *Understanding Contemporauy Issues in India Vivek S. Raj - Civil Services Times.*
८. *आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्या प्रकाशन औरंगाबाद.*


□ □ □

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded